**पीजीए २१/२०२१** **पान क. ०५** **निशाणी कमांक यु–०५**

**सरतपासणी श्रीमती राहाटे वकील अर्जदारा तर्फे**:–

०६. आता मला माझे शपथपत्र नि.क्र. यु–०५ दाखविले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर माझ्या सांगितल्याप्रमाणे खरा व बरोबर आहे. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल मला गैरअर्जदार यानी दिनांक १८/५/१९७९ रोजी दिलेल्या नियूक्तीच्या आदेशाची मूळ प्रतीवरुन पडताळणी केलेली प्रत दाखवीली, त्यावर माझे नाव नमूद आहे त्यास **निशाणी यु–६** देण्यात येते. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल मी वरिष्ठ लेखा अधिकारी महाराष्ट्र जिवण प्राधीकरण, मुंबई याना दिनांक १६/४/२०१५ रोजी माझी रोखून ठेवलेली रक्कम परत मीळण्याबाबत दिलेल्या पत्राची माझे स्थळ प्रतीवरुन पडताळणी केलेली प्रत दाखवीली त्यावर माझी सही आहे, त्यास निशाणी **यु–७** देण्यात येते. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल मी दिलेल्या दिनांक १६/४/२०१५ च्या पत्राच्या उत्तरामध्ये उपमुख्य लेखा अधिकारी यानी दिनांक २४/६/२०१५ रोजी मला दिलेल्या पत्राची छायांकीत पत्र दाखवीली त्यास **आर्टीकल 'ए'**, देण्यात येते. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल माझे भारतीस स्टेट बॅक चन्द्रपूर येथील खाते पुस्तकाची दोन पानाची मूळ प्रतीवरुन पडताळणी केलेली प्रत दाखवीली त्यास **निशाणी यु–८** देण्यात येते. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल माझे माहे स्प्टेंबर २०१२ चे पगारपत्रकाची मूळ प्रतीवरुन पडताळणी केलेले प्रत दाखवीले त्यावर माझे नाव नमूद आहे, त्यास **निशाणी यु–९** देण्यात येते.

गैरअर्जदारांचे अधिवक्ता यांचे तोंडी विनंतीवरुन प्रकरण उलटतपासाकरीता पुढील तारखेपर्यन्त तहकूब.

माझे समक्ष

स्वा/–
(श्रीमती रू.वि. मेटे)

न्यायाधीश
कामगार न्यायालय,चंद्रपुर.

दि. २३.०९.२०२४.